**श्री भैय्याजी पांढरीपांडे, नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क**
**हनुमान नगर, नागपूर**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार प्रसार केंद्र**
**वार्षिक अहवाल 2020-2021**

.......................................................................................................

कार्यकारी मंडळ :

- प्राचार्य डॉ. अनंत बरडे –अध्यक्ष
- प्रा. डॉ. नंदा पांगुळ–सचिव
- प्रा. डॉ. विलास घोडे–सदस्य
- डॉ. सौ. पौर्णिमा गंथडे–सदस्य
- श्रीमती शुंभांगी टुले–सदस्य
- श्रीमती शर्मिला दरणे –सदस्य

विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ:

बी.एस.डब्ल्यु–भाग १– साक्षी देवतळे
बी.एस.डब्ल्यु–भाग २– धीरज ठाकरे
बी.एस.डब्ल्यु–भाग ३– सागर गांगुर्डे
एम.एस.डब्ल्यु–भाग १– विवेक सहारे
एम.एस.डब्ल्यु–भाग२– निखिल वैद्य

**मी सावित्रि बोलते** : ३ जानेवारी २०२१ – सावित्रि बाई फुले यांच्या जंयती निमित्त विद्यार्थ्यांना 'मी सावित्रि बोलते' ही शॉर्ट फिल्म ऑनलाइन दाखविण्यात आली. आणि त्यानंतर विद्यार्थ्यांची गटचर्चा घेण्यात आली. त्यात ११ मुली आणि ४ मुले सहभागी होते.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जंयती कार्यक्रम** : ३० एप्रिल २०२१ – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जंयती निमित्त विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज याच्या जीवनावर आधारित ऑनलाइन नाटय दाखविण्यात आले. डॉ. नंदा पांगुळ यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी स्थापन अखिल भारतीय श्री गुरूदेव सेवा मंडळ गुरूकुंज मोजरी याबदद्ल माहिती दिली. यामध्ये १७ मुली आणि ५ मुल उपस्थित होते.

**ग्रामगिता जीवन विकास परीक्षेचे आयोजन** २ मे २०२१ – अखिल भारतीय गुरूदेव सेवा मंडळ गुरूकुंज मोझरीद्वारा आयोजित ग्रामगिता जीवन विकास परीक्षेचे दि. २ जानेवारी २०२० ला आयोजन करण्यात आले. यात ,प्रविण–२५, ग्रामनाथ –०५,ग्रामगीतारत्न –०४, आणि ग्रामगिताचार्य–०२ परिक्षेला बसले होते. कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या फोटोला हार घालुन करण्यात आली. राष्ट्रसंतांच्या विचाराचे महत्व डॉ नंदा पांगुळ यांनी विशद केले. कोरोना काळातील शासनाचे नियम पाळून ग्रामगीता जीवन विकास परिक्षेचे नियोजन केले गेले.

**शेतीशाळा प्रशिक्षण** : ६ जानेवारी २०२१–नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजने अंतर्गतरोहनखेडा येथील बचत गटातील महिलांसाठी आयोजित केलेल्या शेतीशाळा प्रशिक्षणात सहभाग घेवून महिलांना डॉ नंदा पांगुळ यांनी मार्गदर्शन केले.

**उद्योग विषयक मार्गदर्शन** :७ जानेवारी २०२१ – रोहनखेडा जिल्हा वर्धा येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजने अंतर्गत रोहनखेडा येथील बचत गटातील महिलांसाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमात महिलांना आर्थिक संक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातुन उद्योगा संदर्भात डॉ नंदा पांगुळ यांनी मार्गदर्शन केले.

**कोरोना प्रतिबंधासाठी कार्यक्रम** : ७ जानेवारी २०२१ – रोहनखेडा जिल्हा वर्धा येथे महिलांना मास्क, कोरोना प्रतीबंधासाठी आर्सेनिक अल्बम औषधी वाटप करण्यात आले तसेच कोरोना काळात आरोगयाची काळजी कशी घ्यायची यासंदर्भात जानीवजागृती करण्यात आली.

Dr. A. S. Barde
Officiating Principal
B. P. National Institute of Social Work
Hanuman, Nagar, Nagpur.